महाराष्ट्राचा बुलंद आवाज । दैनिक

# मराठवाडा पत्र

बीड । महाराष्ट्र
शुक्रवार दि.२०/२/२०२६
वर्ष ५ वे । अंक ३२०
पान १ । पाने ४
किंमत ३ रूपये

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955
E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

RNI/MAHMAR/2021/80074 । Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 । https://marathwadapatra.com । https://epaper.marathwadapatra.com










## जय भवानी,जय शिवाजी या घोषणांनी शहर दणाणले

# छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सकाळी अभिवादन करण्यासाठी येथील शिवतिर्थावर मोठा जनसागर उसळला होता. सकाळी ७ वाजता जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पन करून प्रतिमेचे शासकीय महापुजन करून अभिवादन केले.



यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, शल्य चिकित्सक डॉ. सतिशकुमार सोळंके, न.प. चे मुख्याधिकारी शैलेश फडसे, तहसीलदार चंद्रकांत शेळके,आ.संदीप क्षीरसागर यांची उपस्थिती होती. त्यानंतर आ.विजयसिंह पंडित, नगराध्यक्षा प्रेमलता पारवे, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, सभापती शेख निजाम, गटनेते फारूक पटेल, कल्याण आखाडे, दिलीप गोरे, भिमराव वाघचौरे, सीए बी.बी. जाधव, झुंजार धांडे, संदीप आदमाने, मनोज गोडसे, अमर नाईकवाडे यांनीही छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन केले. डॉ.योगेश क्षीरसागर, दत्ता गायकवाड, नागेश तांबारे, गणेश जाधव यांच्यासह शिवप्रेमी, सर्व सामान्य नागरीक यांनीही छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले. जय भवानी जय शिवाजी, जय शिवराय अशा घोषणांनी बीड शहर दणाणून गेले होते.

## विविध शाळांची रॅली

छत्रपती शिवजंयतीच्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्यायभवन बीड येथुन सकाळी ९.०० वाजता जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान यांनी रॅलीला हिरवी झेंडी दाखवुन सुरुवात केली. रॅलीमध्ये आर्य भारत स्वयंसेवक, एनसीसी, एनएसएस पथक,स्काऊट गाईडचे विद्यार्थी, अधिकारी, कर्मचारी सहभागी झाले होते. रॅली माने कॉम्प्लेक्स मार्गे मार्गस्थ होऊन यशवंराव चव्हाण नाटयगृह येथे समारोप झाला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा क्रिडा अधिकारी, शिक्षक, शिक्षिका, संबधित अधिकारी, कर्मचारी ,नागरिक उपस्थित होते.



## शासकीय महापुजन

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज सकाळी ७.०० छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन प्रतिमेचे शासकीय महापुजन करुन अभिवादन केले. या वेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, पोलीस अधिक्षक नवनित कॉवत, जिल्हा शल्य चिकित्सक सतीशकुमार सोळंके, नगर परिषदेचे मुख्याधिकारी शैलेस फडसे,तहसीलदार चंद्रकांत शेळके, आमदार संदिप क्षीरसागर, अधिकारी, कर्मचारी, नागरिक, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात

### वर्षाअखेर एसटी आर्थिकदृष्ट्या सुदृढ

**मुंबई । वृत्तसेवा**

दैनंदिन एक ते दीड कोटी रुपयांची तूट सहन करत आर्थिक दडपणाखाली असलेल्या एसटीला नवसंजीवनी देण्यासाठी शासनाने मोठा निर्णय घेतला आहे. बसेसची कमतरता हा मुख्य अडथळा दूर करत यंदा तब्बल ८ हजार ३०० नवीन बसेस ताफ्यात सामील करण्याचा निर्णय परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी घेतला आहे. बसेस वाढल्या तर प्रवासी वाढतील, आणि प्रवासी वाढले तर उत्पन्न आपोआप वाढेल, असा विश्वास सरनाईक यांनी व्यक्त केला. कोरोना महामारीपूर्वी एसटीकडे १८ ते १९ हजार बसेस होत्या. दररोज सुमारे ६६ लाख प्रवासी एसटीने प्रवास करत होते. मात्र महामारी आणि दीर्घकालीन कर्मचाऱ्यांच्या संपामुळे गेल्या चार-पाच वर्षांत बसखरेदी रखडली. परिणामी २०२४ अखेर बसेसची संख्या घटून सुमारे १२,६०० वर आली. दरम्यान, राज्य शासनाने महिलांना तिकिटात ५०% सवलत आणि ७५ वर्षांवरील ज्येष्ठांना मोफत प्रवास दिल्याने प्रवाशांचा ओघ पुन्हा

### विद्यार्थ्यांना सामाजिक जाणीवेचे धडे

**बीड । प्रतिनिधी**

आदित्य औषधशास्त्र महाविद्यालय येथील विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमातील सामाजिक बांधिलकी उपक्रमांतर्गत लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब वृद्धाश्रम, घाटसावळी येथे भेट देत सामाजिक संवेदनशीलतेचा जिवंत अनुभव घेतला.५० विद्यार्थ्यांनी अनाथ-वृद्धाश्रम भेटीतून सामाजिक जाणीवेचे धडे मिळाले.अभ्यास क्रमानुसार अनाथ/ वृद्धाश्रम भेट देणे अनिवार्य असून,विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, सार्वजनिक विकासाची भावना आणि समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा निर्माण व्हावी हा या उपक्रमामागील उद्देश आहे. दि.१४ फेब्रुवारी ▶▶ पान २ वर

## धमक्यांना कंटाळून तरुणाची आत्महत्या

**धारूर । प्रतिनिधी**

### सुसाईड नोटमध्ये तिघांची नावे

येथील केज रोडवर असलेल्या मोरया ऑटोमोबाईल गॅरेजमध्ये एका २२ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. संबंधित तरुणाने आत्महत्येपूर्वी एक चिठ्ठी लिहून ठेवली असून, त्यामध्ये तिघांच्या धमक्यांना कंटाळून हे पाऊल उचलत असल्याचे नमूद केले आहे. या प्रकरणी धारूर पोलिसांनी तिघांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. दिनेश आसाराम सावंत असे मयत तरुणाचे नाव असून तो रेपेवाडी येथील रहिवासी होता. या प्रकरणी त्याचा भाऊ मुंजाराम आसाराम सावंत (वय २४) याने फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, दिनेश आणि मुंजाराम हे धारूरमध्ये भाड्याने घेतलेले गॅरेज चालवत असत. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी जेव्हा मुंजाराम गॅरेजवर गेला, तेव्हा शटर आतून बंद असल्याचे आढळले. शटर तोडून आत प्रवेश केला असता दिनेशने पिवळ्या नायलॉनच्या दोरीने गळफास घेतल्याचे दिसून आले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. यावेळी दिनेशच्या खिशात एक चिठ्ठी सापडली, ज्यात संतोष रेपे, सर्जेराव रेपे (दोन्ही रा. रेपेवाडी) आणि ▶▶ पान २ वर

## रिव्हॉल्वर घेऊन फिरणारा पोलिसांच्या ताब्यात

**बीड । प्रतिनिधी**

### बीड स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



बीड छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त सुरू असलेल्या बंदोबस्तादरम्यान बीड येथील स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत कंबरेला गावठी कट्टा (बंदूक) लावून फिरणाऱ्या एका विधीसंघर्ष बालकास ताब्यात घेतले आहे. बीड जिल्ह्यामध्ये मागील काही महिन्यापासून रिवाल्वर आढळून येत असून या रिवाल्वर कोण विक्री करत किंवा कुठून आणल्या जातात याची सखोल तपासणी करण्याची नितांत गरज आहे. दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी बंदोबस्तावर असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला माहिती मिळाली की, एक विधीसंघर्ष बालक कंबरेला गावठी बनावटीचा कट्टा लावून माने कॉम्प्लेक्स परिसरात थांबलेला आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत छापा टाकला. या कारवाईत संबंधित विधीसंघर्ष बालकास ताब्यात घेण्यात ▶▶ पान २ वर

## गणपत डोईफोडे यांच्या पुढाकारातून...

# बीड-पिंपळनेर रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे काम मार्गी



**पिंपळनेर । प्रतिनिधी**

बीड-पिंपळनेर हा रस्ता ईट दुपारी वस्ती पर्यंतचा रस्ता बी.बी. एम. करून अर्धवट सोडण्यात आला होता. ज्यामुळे हा रस्ता उखडून रस्त्यावर मोठाले खड्डे पडले होते. यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले होते. गेल्या हप्त्यात याच रस्त्यावर पारुबाई काटे या महिला पडल्या होत्या ज्यात त्यांच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने संभाजीनगर येथील घाटी येथे ऍडमिट करण्यात आले होते. याविषयी अनेक दैनिकाला बातम्या झळकल्या होत्या. मा.जि.प. सदस्य गणपत डोईफोडे यांनी पुढाकार घेत बांधकाम विभागाने कार्यकारी अभियंता तोंडे साहेब यांना निवेदन देत त्या भागाचे आमदार विजयराजे पंडित यांच्याकडे हा विषय मार्गी लावण्याची विनंती केली होती. विजयराजे यांनी अभियंता तोंडे यांना फोन लावत सदर काम मार्गी लावण्याच्या सूचना केल्या होत्या. तर तोंडे साहेब यांनी दोन दिवसात या रस्त्यावरील खड्डे बुजण्याचे आश्वास ▶▶ पान २ वर



## संपादकीय

# पेरले ते उगवले

पाकिस्तानातील मशिदीतील स्फोटाची जबाबदारी घेणारा आयसिस म्हणजे इराक आणि सीरीयातील सुन्नी मुस्लिम गट आहे. त्यांचा उद्देश्य असतो की शियांच्या धार्मिक स्थळांवर हल्ले करायचे आणि त्यांना ठार मारायचे. काही वर्षापूर्वी त्यानी लाखो लोकांवर राज्य केले आणि त्याद्वारे आपली दहशत पसरवली. इस्लामाबादमधील एका शिया पंथाच्या दर्ग्यानजीक एका आत्मघातकी मानवी बाँबने स्वतःला उडवले. या स्फोटात ३१ लोक ठार तर १६९ जण जखमी झाले. तरलाई इमामबर्ग येथे हा शक्तीशाली बाँबस्फोट झाला.आता पाकिस्तानने अफगाणिस्तानवर आणि भारतावर या स्फोटाचे खापर फोडले. पाकिस्तानचे म्हणणे आहे, की अफगाणिस्तानच्या दहशतवाद्यांनी स्फोट घडवला पण भारताने त्यांना आर्थिक मदत केली. पाकचा हा कुटील कांगावा आहे हे सहज लक्षात येते. कारण भारत कुणाच्याही देशात ढवळाढवळ करत नाही आणि पाकच्या उलट्या काळजाच्या देशात तो असे उद्योग करण्याची शक्यता जवळपास नाही. अद्याप कोणत्याही गटाने स्फोटाची जबाबदारी स्वीकारली नाही. तरीही पाकने अफगाणिस्तान आणि भारतावर या स्फोटाचे खापर फोडले. मुळात पाकने आतापर्यंत दहशतवाद्यांना पोसण्याचे काम केले. तो दहशतवाद्यांचा सरपरस्त आहे. त्यामुळे पाकचे औषध त्यालाच पाजण्यात आले. कारण पाकने आतापर्यंत हेच केले. त्याने निरपराध भारतीय नागरिकांना ठार केले. तेही शेकड्यांनी. २००८ चा बॉम्बहल्ला आणि दहशतवाद्यांचा धूडगूस आणि भारतातील ट्रेनमध्ये घडवलेले स्फोट मालिका अशी कितीतरी उदाहरणे आहे. त्यामुळे पाकवर असा दशहतवादी हल्ला झाला तर त्याबद्दल फारसे वाईट वाटण्याचे काही कारण नाही. पाकला सुसाईड बाँबहल्ले नवे नाही. तीन महिन्यांपूर्वी इस्लामाबाद येथे अशाच एका सुसाईड बाँबरने हल्ला केला होता. या हल्ल्याचा पाकचे अध्यक्ष आणि पंतप्रधान यांनी निषेध केला. पण त्यात काही अर्थ नाही. कारण आतापर्यंत पाकने जे पेरले तेच उगवले. त्यातही पाकचा खोटारडेपणा असा, की भारतावर आरोप करताना पाक हे विसरला, की भारत दुसऱ्या देशात असे उद्योग करत नसतो. हे पाकचे काम आहे. पाकिस्तानचा मित्र म्हणून चीनने या हल्ल्याचा निषेध केला. कोणताही हल्ला होणे आणि त्यात निरपराध नागरिकांचे बळी जाणे हे नेहमीच वाईट असते. पण पाकने भारतावर पूर्वी असेच हल्ले केलेत. पेहलगाम येथे निरपराध हिंदू कुटुंबियांना पाकच्या दहशतवाद्यांनी वेचून ठार केले. त्यामुळे पाकने आता कितीही व्याख्यान झोडले तरीही पाकचे कृत्य नापाक आहे हे जगापासून लपून राहिलेले नाही. पाकचे गृहमंत्री मोहसिन नकवी यांनी म्हटले, की भारताने अफगाणिस्तानातील दहशतवाद्यांना पैशाची मदत केली आणि त्यामुळेच हा हल्ला झाला. पण त्यांनी कोणतेही पुरावे दिले नाही. मागेही भारतातील हल्ले पाक पुरस्कृत होते. पाकने चीनच्या मदतीने मसूद अझर याला अनेक वर्षे दहशतवादी घोषित करण्यास अडथळे आणले. त्यात चीनने आपला व्हेटो अधिकार वापरून मसूदला दहशतवादी घोषित करू दिले नाही. भारताने कित्येक वेळा पाककडे अझरला आपल्या हवाली करण्याची मागणी केली होती. पण तसे झाले नाही. तोच पाकिस्तान आता भारतावर आरोप करत आहे. खरी वस्तुस्थिती अशी आहे, की आपल्या सामाजिक रचनेला भेडसावणाऱ्या समस्यांवर उपाय शोधण्याऐवजी पाकिस्तान भारत किंवा अन्य एखाद्या देशाविरोधात असे कट रचल्याचा आरोप करतात पण त्यात तथ्य नसते. भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात शाब्दिक युद्ध सुरु झाले. कारण पाकचा आरोप निराधार आहे. हे भारताच्य संरक्षण मंत्रालयाने स्पष्ट केले असून पाकने स्वतःची सुरक्षा यंत्रणा तपासावी आणि त्यातील कमतरता दूर कराव्यात असा सल्ला दिला. पाकिस्तानी सरकार आणि मीडिया नेहमीच असे बेजबाबदार आणि हास्यास्पद आरोप कुठल्याही पुराव्याशिवाय करतात आणि हा प्रकार त्यातलाच आहे. पाक हा नेहमीच भारत तर कधी अफगाणिस्तानवर आरोप करतो. पाकवर मृतांच्या कुटुंबियाना उत्तरे देण्याची जबाबदारी वाढत आहे आणि त्यापासून आपली सुटका करून घेण्यासाठी पाक असे डाव आखतो. इस्लामाबादमधील घटनेने केवळ देशातील प्राणघातक सुरक्षा त्रुटी उघड केल्या नाहीत तर प्रादेशिक तणावही वाढवला आहे. पाकिस्तानने दहशतवाद्यांशी लढण्यात आपण शून्य प्रगती केल्याचे दाखवून दिले. पण इस्लामाबादमधील हल्ल्याने त्यांची ही प्रगती किती नाजूक अवस्थेत आहे हे लक्षात आणून दिले. आता इस्लामिक स्टेटने या भीषण हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आणि २००८ मध्ये झालेल्या मॅरियट हॉटेलच्या बाँबस्फोटानंतर हा हल्ला इस्लामाबादेतील सर्वात भीषण हल्ला असल्याचे म्हटले आहे. पाकने चार संशयितांना अटक केली आहे. पाकिस्तानातील मशिदीतील स्फोटाची जबाबदारी घेणारा आयसिस म्हणजे इराक आणि सीरीयातील सुन्नी मुस्लिम गट आहे. त्यांचा उद्देश्य असतो की शियांच्या धार्मिक स्थळांवर हल्ले करायचे आणि त्यांना ठार मारायचे. काही वर्षापूर्वी त्यानी लाखो लोकांवर राज्य केले आणि त्याद्वारे आपली दहशत पसरवली. हाय प्रोफाईल हल्ले करण्याची त्यांची क्षमता कायम आहे. त्यांची पाळेमुळे सीरियाच नव्हे तर अगदी ऑस्ट्रेलियापर्यंत पसरली आहेत आणि नुकताच त्यांनी त्या देशात भीषण हल्ला घडवून १५ लोकांना ठार केले होते. गेल्या काही वर्षात पाक अफगाणिस्तान सीमेवर वाढत्या दहशतवादाचा सामना करावा लागला असला तरीही राजधानी इस्लामाबादमध्ये असा हल्ला होणे ही क्वचितच घडणारी बाब आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने या हल्ल्याचा निषेध केला असून त्यांनी म्हटले आहे, की युद्ध गुन्ह्यांत याचा समावेश होऊ शकतो. भारताने म्हटले आहे, की पाक स्वतःच्या देशांतील सामाजिक चौकटीतील समस्या सोडवण्याऐवजी इतरांवर म्हणजे भारतावर त्याचा दोष ढकलत आहे हे अत्यंत वाईट आणि अशोभनीय आहे. शिया आणि सुन्नी मुस्लिम यांच्यात पंथीय हिंसाचार आणि वैर सर्वश्रुत आहे. त्यामुळे या शिया दर्ग्यावर हल्ला करण्यात आला आणि आयसिसच्या तत्वानुसार हे योग्य आहे. याचे आणखी एक कारण आहे ते म्हणजे शिया जमात ही आयसिसविरोधात लढण्यासाठी मनुष्यबळ पुरवते आणि हा हल्ला म्हणजे प्रत्युत्तर म्हणून हल्ला होता. राजधानीत आपण दहशतवाद पेरू शकतो आणि आयसिसची क्षमता राजधानीतही हल्ले करण्याची आहे हे दाखवून देण्यासाठी हा हल्ला होता असेही मानण्यात येते.

# शेती, शिक्षण, आरोग्यावर लक्ष

जगातील सर्वांत मोठ्या तंत्रज्ञान कार्यक्रमांपैकी एक असलेल्या 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट-२०२६' ला १६ फेब्रुवारी रोजी दिल्लीतील 'भारत मंडपम' येथे प्रारंभ झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या परिषदेचे औपचारिक उद्घाटन केले. त्यानंतर त्यांनी सहभागी स्टार्टअपच्या मंडपांना भेट देऊन त्यांच्या नवोपक्रमांबद्दलची माहिती जाणून घेतली. 'एआय'च्या माध्यमातून वास्तविक जीवनात शेती, आरोग्य आणि शिक्षण यासारख्या क्षेत्रांमध्ये भविष्यात होणारे बदल कसे असतील यावर विशेष लक्ष देण्यात आले आहे. दिल्लीमध्ये सुरू झालेली एआय परिषद २० फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे. पुढील चार दिवसांत जगभरातील कंपन्या आपापले नवीनतम एआय प्रयोग सादर करतील. या परिषदेत सहभागी होणा-या सर्व निमंत्रित, तंत्रज्ञ, कंपन्या आणि शिष्टमंडळ प्रतिनिधींचे पंतप्रधानांनी विशेष आभार मानले आहेत. या शिखर परिषदेची थीम 'सर्वजन हिताय सर्वजन सुखाय' अशी असून याचा अर्थ 'सर्वांचे कल्याण आणि आनंद' असा आहे. मानवतेच्या प्रगतीसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) वापरण्याच्या आपल्या सामाजिक वचनबद्धतेचे हे प्रतिबिंब आहे. हा विषय मानवी हिताला केंद्रस्थानी ठेवून एआयचा वापर करण्याच्या भारताच्या कटिबद्धतेला अधोरेखित करणारा आहे, असे ट्विट पंतप्रधान मोदींनी केले आहे. परिषदेत सहभागी झालेले जगभरातील नेते, उद्योजक, संशोधक आणि धोरणकर्त्यांचे त्यांनी स्वागत केले. या परिषदेद्वारे भविष्याला आकार देण्यास मदत होईल, असा विश्वास मोदींनी व्यक्त केला. 'एआय इम्पॅक्ट समिट' ही कृत्रिम बुद्धिमत्तेविषयी आयोजित करण्यात आलेली जगातील सर्वांत मोठी परिषद आहे. 'एआय'चा भारताच्या नजिकच्या भवितव्यावर कसा परिणाम होईल हे केंद्राकडून जाणीवपूर्वक घेतल्या जाणा-या धोरणात्मक निर्णयांवर अवलंबून असेल. कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास आपोआप होऊ देण्याऐवजी तो व्यापक रोजगारनिर्मितीशी जोडणे गरजेचे आहे, असे मत मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन यांनी मांडले. दरवर्षी लाखो नोक-या निर्माण होत असल्या तरी कौशल्याच्या कमतरतेमुळे तरुणांचा मोठा वर्ग उत्पादनक्षम रोजगारात सामावू शकत नाही. त्यामुळे शिक्षण, कौशल्यविकास आणि नियामक सुधारणांवर तातडीने भर देण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. 'एआय' हा भारताच्या आर्थिक वाटाघाटीतील निर्णायक टप्पा आहे. त्याचे परिणाम अपघाती नसून राजकीय इच्छाशक्ती, सक्षम राज्ययंत्रणांवर अवलंबून असतील. भारताची लोकसंख्यात्मक लाभस्थिती ही संधीही आहे आणि इशाराही आहे. आर्थिक सुधारणांना विलंब झाला तर ही संधी दीर्घकालीन जोखमींमध्ये बदलू शकते. आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा अवलंब आपोआप होणार नाही. त्यासाठी स्पष्ट धोरण आणि तंत्रज्ञानाला मोठ्या प्रमाणात रोजगाराशी जोडण्याची वचनबद्धता आवश्यक आहे. देशाने मजबूत शिक्षण प्रणाली, उच्च गुणवत्तेचा कौशल्य विकास, कामगार केंद्रित सेवा क्षेत्रांचा विस्तार आणि नियामक अडथळे दूर करण्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी निर्णायक पावले उचलली पाहिजेत. एआयचा अवलंब हा एक सहयोगी प्रयत्न असावा. ज्यामध्ये खासगी क्षेत्र, शैक्षणिक संस्था आणि धोरणकर्त्यांचा संयुक्त सहभाग आवश्यक आहे. तंत्रज्ञानाच्या वापरामुळे नोक-या जाण्याची भीती नेहमीच व्यक्त होत असते परंतु तसे नाही, एआयच्या वापरामुळे नोक-या किंवा रोजगार कमी होण्याची शक्यता मुळीच नाही. मात्र, कामाच्या स्वरूपात बदल होऊ शकतो. लोकांकडे आता ऐकण्यासाठी वेळ नाही. ते ५० मिनिटांचा पॉडकास्ट ऐकू शकत नाहीत, सारांश जाणून घेण्यासाठी लोक एआय टूल्स वापरतात. 'इंडिया इम्पॅक्ट एआय समिट'साठी देशभरातून आणि जगभरातून अडीच लाखांहून अधिक सहभागींनी नोंदणी केली असून ती अपेक्षेपेक्षा अधिक आहे. दिल्लीतील एआयच्या 'महाकुंभा'ला जगभरातील नेते, स्टार्टअप्स, नावोन्मेषक आणि संशोधक एकत्र आले आहेत. या शिखर परिषदेवर केवळ भारतच नाही तर सारे जग नजर ठेवून आहे. हा कार्यक्रम भारताच्या जागतिक तांत्रिक भूमिकेसाठी एक ऐतिहासिक टप्पा आहे. एआयचा 'महाकुंभ' जागतिक सहकार्य आणि तांत्रिक नवोन्मेषाला एक नवीन दिशा देईल. ७० हजार चौरस मीटरपेक्षा अधिक क्षेत्रावर उभारण्यात आलेल्या एआय इम्पॅक्ट एक्स्पोमध्ये ३० हून अधिक देशांतील ३००हून अधिक कंपन्या त्यांचे एआय गॅझेट्स आणि तंत्रज्ञान प्रदर्शित करतील. त्यामुळे वास्तविक जीवनात एआय कसे कार्य करते ते जनतेला पाहता येईल.विद्यार्थी आणि तरुणांसाठी 'युवाई'आणि 'एआय फॉर ऑल' सारखे कार्यक्रम उपलब्ध असतील. या कार्यक्रमाद्वारे लोक त्यांचे शिक्षण आणि करिअर वाढवण्यासाठी एआय साधनांचा वापर कसा करायचा हे शिकू शकतील. एक्स्पोमध्ये एआय मॉडेल्स प्रदर्शित करण्यात आले असून शेतीमध्ये पीक रोग ओळखण्यास, रुग्णालयांमध्ये उपचार सुधारण्यास आणि भाषा अनुवाद सुलभ करण्यास मदत करण्याची प्रक्रिया पाहता येईल. भारत आणि परदेशातील स्टार्टअप्स कंपन्या आपली अद्वितीय उत्पादने प्रदर्शित करतील. जनतेला या नवोन्मेषकांशी थेट संवाद साधता येईल आणि भविष्यातील तंत्रज्ञान कसे दिसेल हे समजून घेता येईल. शिखर परिषदेत अनेक थीमॅटिक मंडप तयार करण्यात आले आहेत. या ठिकाणी लोकांना स्मार्ट हेल्थ मॉनिटरिंग आणि एआय ट्यूबर सारख्या एआय संचलित मशिन्स आणि सॉफ्टवेअरचा प्रत्यक्ष अनुभव घेता येईल. सरकार वैद्यकीय विद्यार्थ्यांचे शिक्षण सुधारण्यासाठी ई-पुस्तके आणि एआय-आधारित शैक्षणिक संसाधनांची उपलब्धता वाढविण्याच्या योजनेवर काम करत आहे. या उपक्रमाचा पहिला टप्पा लहान शहरे आणि ग्रामीण भागातील सुमारे ५७ सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांना व्यापणार आहे. एआय इम्पॅक्ट समिटमध्ये दुर्गम वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ई-पुस्तके, डिजिटल क्लिनिकल साहित्य आणि तांत्रिक अभ्यास साहित्य मिळविण्यात मोठ्या अडचणी येतात. म्हणून सरकार एआयच्या मदतीने या विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक सामग्री पोहोचवण्यासाठी एक धोरण विकसित करत आहे. एआयमुळे पारंपरिक कौशल्ये व त्यावर आधारित रोजगार कालबा ठरू शकतील, मात्र संपूर्ण रोजगारच नष्ट होतील असे नाही ही वस्तुस्थिती समजून घेण्याची गरज आहे.

# महापुरुषांनी सांगितलेले विचार आम्ही आमच्या जगण्यात उतरवले पाहिजेत

**बीड । प्रतिनिधी**

आजच्या काळात आपण महापुरुषांचा जयजयकार करतो, त्यांना डोक्यावर घेतो, पण त्यांचे विचार डोक्यात घेत नाही. जोपर्यंत महापुरुषांचे विचार आपल्या आचरणात येत नाहीत, तोपर्यंत आपले डोके सुपीक होणार नाही आणि खऱ्या अर्थाने समाजाचे परिवर्तन घडणार नाही, असे परखड मत प्रसिद्ध व्याख्याते प्रा. बापुसाहेब शिंदे यांनी व्यक्त केले. तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने गुरुवार, दि. १९ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त 'तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात' भव्य व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तुलसी शैक्षणिक समूहाचे संचालक प्रा. प्रदीप रोडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.अर्जुन



राठोड, इंजि. रविंद्र कोलप तसेच संस्थेच्या विविध विभागांचे प्राचार्य प्रा.डी.जी. निकाळजे, डॉ. अश्विनी बेद्रे, डॉ. विजयकुमार बांदल, प्रा. डी.डी. राऊत, प्रा. प्रकाश ढोकणे आणि आयु. उमा जगतकर यांची प्रमुख उपस्थिती होती. महापुरुषांच्या कार्याची सांगड घालताना प्रा. शिंदे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यात एक 'गुरु-शिष्य' नाते होते. शिवरायांनी स्त्रियांना समाजात सन्मान मिळवून दिला, महात्मा फुलेंनी त्यांना शिक्षण दिले, तर डॉ. आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून कायद्याचे अधिकार प्राप्त करून दिले. या तिन्ही महापुरुषांच्या विचारांचा संदेश आपल्या दैनंदिन जीवनात उतरवणे ही आजची सर्वात मोठी गरज आहे. पुढे राजमाता जिजाऊंच्या योगदानाबद्दल बोलताना प्रा. शिंदे म्हणाले की, पावणे चारशे वर्षांपूर्वी जेव्हा देशात मुघलशाही, आदिलशाही आणि निजामशाहीचे वर्चस्व होते, अशा कठीण परिस्थितीत राजमाता जिजाऊंनी स्वराज्याचे स्वप्न पाहिले. जोपर्यंत महिला आत्मनिर्भर होत नाहीत, तोपर्यंत त्यांना समाजात सन्मान मिळणार नाही, हा जिजाऊंचा विचार आजही तितकाच महत्त्वाचा आहे. प्रत्येक स्त्रीला स्वावलंबी करणे हेच या महामातांचे ध्येय होते, असे स्पष्ट केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य प्रा. डी.जी. निकाळजे यांनी संस्थेच्या ध्येयधोरणांवर प्रकाश टाकत म्हटले की, महापुरुषांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन सक्षम पिढी निर्माण करणे हे संस्थेचे मुख्य उद्देश आहे. अध्यक्षीय भाषणात प्रा.प्रदीप रोडे म्हणाले की, जर तुम्हाला तुमच्या स्वप्नांना वास्तवात बदलायचे असेल, तर महान व्यक्तींच्या जीवनकथांचा अभ्यास करा. त्यातून प्रेरणा आणि ऊर्जा मिळेल, आणि तुमच्या ध्येयापर्यंत पोहोचण्याचा मार्ग स्पष्ट होईल.जसे छत्रपती शिवाजी महाराज यांनी धैर्य आणि रणनीतीने शत्रूंचा पराभव केला, तसे तुम्हालाही चिकाटीने तुमचे उद्दिष्ट साध्य करता येईल, असे सांगितले. यावेळी महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी महा विद्यालयाला पुस्तके भेट देऊन नवा आदर्श निर्माण केला. यानंतर शिव जयंतीनिमित्त आयोजित विविध स्पर्धांमधील यशस्वी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.योगिता लांडगे व विद्यार्थ्यांनी केले. तर आभार प्राचार्य डॉ.विजयकुमार बांदल यांनी मानले. यावेळी तुलसी समूहातील प्राध्यापक, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान १ वरून

### रिव्हॉल्वर घेऊन...

आले असून त्याच्याकडून एक गावठी बनावटीचा कट्टा जप्त करण्यात आला आहे. त्यानंतर त्यास पुढील कारवाईसाठी शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या स्वाधीन करण्यात आले. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात शस्त्र अधिनियम कलम ३/२५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत. ही कारवाई नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक बीड, सचीन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक बीड, तसेच शिवाजी बंटेवाड, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या पथकात सपोनि धनराज जारवाल, पोउपनि श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार अशोक दुबाले, सोमनाथ गायकवाड, बाळू सानप, आनंद मस्के, अर्जुन यादव, मनोज परजणे व चालक सिद्धेश्वर मांजरे यांनी सहभाग घेतला.

### धमक्यांना कंटाळून...

अशोक लोमटे यांच्याकडून मिळणाऱ्या धमक्यांमुळे आत्महत्या करत असल्याचे लिहिले होते. यापूर्वी दिनेशवर एक गुन्हा दाखल झाला होता, ज्यामुळे तो तणावात होता, त्यातच या धमक्यांमुळे त्याने हे टोकाचे पाऊल उचलले असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. धारूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास सहा. पोलीस उप-निरीक्षक अनिल पांडे करत आहेत.

### बीड-पिंपळनेर...

देत गुत्तेदार यांना नोटीस काढत मे महिन्यापर्यंत रस्ता जर पूर्ण नाही केला तर सदर काम काढून घेण्यात येईल अशी तंबी ही दिली होती. सदर मागणीला प्रथम स्वरूपी यश आल आहे, मात्र हा रस्ता पूर्ण करण्यासाठी आणखी जोर लावावा लागेल. हे मात्र आज तरी सांगता येणार नाही.

### वर्षाअखेर एसटी...

वाढू लागला. सध्या दररोज सुमारे ५० लाख प्रवासी एसटीने प्रवास करतात; मात्र अनेक मार्गांवर फेऱ्या अपुऱ्या पडत आहेत. एसटीच्या दीर्घकालीन धोरणानुसार पुढील काही वर्षांत २० ते २५ हजार बसेस खरेदी करण्याचा मानस आहे. त्यास राज्य शासनाची तत्वतः मान्यता मिळाली असून, यंदा पहिल्या टप्प्यात ८,३०० बसेस दाखल होणार आहेत. त्यामध्ये ३,००० '३२' आसन रचनेच्या ५५ आसनी बसेसचा समावेश आहे. या बसेस मार्चपासून टप्प्याटप्प्याने एसटीच्या ताफ्यात दाखल होणार आहेत. या बसेसनां 'राजमाता जिजाऊ साहेब' यांचे नाव देण्यात आले असून, दोन शहरादरम्यान गर्दीच्या मार्गांवर धावणार आहेत. याशिवाय ५,००० साध्या बसेसही एसटीच्या ताफ्यात दाखल होणार आहेत. त्यांच्यासाठीची निविदा प्रक्रिया सध्या अंतिम टप्प्यात आहे. तसेच दुर्गम आणि आदिवासी भागांपर्यंत सेवा पोहोचवण्यासाठी १०० मिडी बसेसही एसटीच्या ताफ्यात दाखल करून घेतल्या जातील. त्या बरोबरच खाजगी वाहतुकीशी स्पर्धा करण्यासाठी २०० अत्याधुनिक बसेस खरेदी केल्या जाणार आहेत. या सर्व बसेस ताफ्यात आल्यावर दररोज ७० ते ७५ लाख प्रवासी वाहतुकीचे लक्ष्य गाठण्याचा महामंडळाचा मानस आहे. दरम्यान, सध्या एसटीचा दैनंदिन खर्च ३४ ते ३५ कोटी रुपये, तर उत्पन्न सुमारे ३३ कोटी रुपये आहे. म्हणजेच रोजची तूट १ ते १.५ कोटींच्या घरात आहे. याबाबत मंत्री सरनाईक म्हणाले, एसटी हा नफा कमावणारा उद्योग नाही; ती राज्यातील सर्वसामान्यांसाठी जीवनवाहिनी आहे. मात्र किमान तोटा टाळण्यासाठी खर्च-उत्पन्नाचा समतोल साधणे आवश्यक आहे. नवीन बसेस आल्यावर उत्पन्न निश्चित वाढेल आणि एसटी आर्थिकदृष्ट्या सुदृढ होईल'', असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. ग्रामीण भागातील मुक्कामी फेऱ्या, आदिवासी पाड्यांपर्यंत सेवा, दोन शहरादरम्यान गर्दीच्या मार्गांवर अतिरिक्त गाड्या या सर्वांमुळे एसटीची पकड पुन्हा मजबूत होणार आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यात धावणारी 'लालपरी' आता नव्या जोमाने, नव्या ताफ्यासह आणि नव्या आर्थिक बळावर पुन्हा भरारी घेण्याच्या तयारीत आहे. यावर्षाअखेर एसटी आर्थिक गर्तेतून बाहेर येईल, हा आमचा दृढ विश्वास आहे, असेही प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

### विद्यार्थ्यांना सामाजिक...

रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत झालेल्या या भेटीत ५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या जीवनप्रवासाची माहिती जाणून घेतली. तसेच कडधान्ये व फळांचे वाटप करून सामाजिक कर्तव्याची जाणीव प्रत्यक्ष कृतीतून व्यक्त केली. वृद्धाश्रमाचे संचालक व समाजसेवक चंद्रकांत सर यांनी समाजाशी नाळ जोडून काम करण्याचे महत्त्व स्पष्ट केले. युवा पिढीने सामाजिक बांधिलकी जोपासली तरच समाज सुदृढ बनेल, असे मार्गदर्शन त्यांनी केले. डॉ. कुमार सुरवसे यांनी अनाथ व वृद्धांच्या समस्या, त्यांच्या जीवनातील संघर्ष आणि समाजाने त्यांच्याप्रती असलेली जबाबदारी यावर सखोल मार्गदर्शन केले. या उपक्रमासाठी आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा व संचालिका डॉ. आदिती सारडा यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्य डॉ. सुरवसे यांच्या संकल्पनेतून,प्रा. मोराळे व प्रा. वाघमोडे यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. *समाजाशी नाळ जोडण्याचा संदेश : अनाथ व वृद्धाश्रम भेट ही केवळ अभ्यासक्रमाची औपचारिकता नसून, विद्यार्थ्यांमध्ये मानवतेचे मूल्य रुजवणारा उपक्रम आहे. युवा पिढीने समाजातील दुर्लक्षित घटकांकडे सहानुभूतीने पाहून त्यांच्या उन्नतीसाठी पुढाकार घेतला तरच सामाजिक विकासाला खरी गती मिळेल, असा संदेश या भेटीतून देण्यात आला.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

दैनिक मराठवाडा पत्र



## थोडक्यात...

### बेरोजगार तरुणांसाठी शिवसेनेचा रविवारी नोकरभारती मार्गदर्शन मेळावा

#### बीड जिल्ह्यातील तरुणांना नामांकित कंपनीत नोकरीची संधी - उल्हास गिराम



**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात संभाजीनगर, पुणे, अहिल्यानगर या भागात असणाऱ्या टाटा मोटार, वोरफूल, बजाज, फियाट, टाटा बॅटरी आटोमोबाईल, इलेक्ट्रिक, आय टी सेक्टरशी निगडित असणाऱ्या नामांकित कंपनीत प्रशिक्षण देऊन नोकरीं ची संधी मिळणार आहे.बीड जिल्हातील बेरोजगार १० वी पास व त्यावरील शिक्षण असणाऱ्या युवक-युवतीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने नोकरभारती मार्गदर्शन मेळावा आयोजित केल्याचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी सांगितले. सदरील मेळावा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कार्यालय, बस्थानका मागे डी. पी रोड बीड या ठिकाणी रविवार दि २२ रोजी सकाळी १०:३० वाजता सुरु होणार होणार आहे. सदरील मेळाव्या नामांकित कंपनी चे प्रतिनिधी प्रत्यक्ष उपस्थित राहणार असुन, अनुभव असणाऱ्यांना स्पॉट वर नियुक्ती, तर फ्रेशर तरुणांना प्रशिक्षण देऊन नोकरीं ची संधी मिळणार आहे. सोबत शैक्षणिक कागदपत्रे ठेवावीत. बीड जिल्यातील १० वी पास व त्यावरील शिक्षण असणाऱ्या तरुणांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन शिवसेना जिल्हा समन्वयक संजय महाद्वार, उपजिल्हापमुख सुशील पिंगळे यांनी केले आहे.

### पात्रुडमध्ये रांगोळीच्या माध्यमातून अवतरले शिवराय; रंजना आणि सुरेखा यादव यांची अनोखी मानवंदना



**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील पात्रुड येथे शिवजयंतीचा उत्साह ओसंडून वाहत असतानाच, रंजना यादव आणि सुरेखा यादव या तरुणींनी आपल्या कलेच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांना आगळीवेगळी मानवंदना दिली आहे. अत्यंत आकर्षक आणि जिवंत वाटणारी महाराजांची प्रतिकृती त्यांनी रांगोळीच्या माध्यमातून साकारली असून, परिसरातील नागरिकांकडून या दोघींच्या कलेचे मोठे कौतुक होत आहे.अंजली किराणा आणि जनरल स्टोअर्सच्या समोर साकारण्यात आलेली ही भव्य रांगोळी पाहण्यासाठी ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती. शिवजयंतीच्या निमित्ताने केवळ मिरवणुकांवर भर न देता, अशा प्रकारे सर्जनशील पद्धतीने महाराजांचा आदर व्यक्त करण्याचा या तरुणींचा प्रयत्न प्रेरणादायी ठरत आहे. अत्यंत सूक्ष्म बारकाव्यांसह रेखाटलेली ही कलाकृती पात्रुड गावातील मुख्य आकर्षणाचे केंद्र ठरली आहे. यादव भगिनींच्या या उपक्रमाचे संपूर्ण माजलगाव तालुक्यात कौतुक होत असून, सोशल मीडियावरही या रांगोळीचे फोटो मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.

### कै बाबा साहेबवराट वाचनालयात छ. शिवाजी महाराज जयंती साजरी



**गेवराई । प्रतिनिधी**

तालयुकयातील कै बाबासाहेब वराट सार्वजनिक वाचनालय बराहाणपुर ता गेवराई जि बीड याच्या विदयामाने आयोजित केले. छ शिवाजी महाराज जयंती उतसाहात महाराज ना पुष्प हार घालून अभिवादन करण्यात आले यावेळी वाचनालयाचे अधिशक भागवत वराट यांनी मार्गदर्शन पर भाषण केले या कार्य करमास अमित कानडे सर संतोष कसबे मसु वराट पांडुरंग पवार अरुण कसबे राधाकिसन पवार सुरेश वराट याच्या सह बहुसखे वाचक उपस्थित होने चहा पाणा नंतर कार्य कर्म सपपन झाला आभार प्रदर्शन संतोष कसबे यांनी केले.

### ढेकनमोहा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील ढेकणमोहा येथे मातोश्री रमाबाई आंबेडकर सेवाभावी संस्था यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात व भक्तीभावाने साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले जयंतीनिमित्त तसेच सामाजिक बांधिलकी जपत विविध सेवाभावी उपक्रम राबविण्याचा संकल्प संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आला. या कार्यक्रमास , हनुमान देवकते, बाबुराव तांदळे साहेब ग्रामसेवक, योगेश गणगे ग्रामसेवक तांडा, भगवान देवकते, भास्कर देवकते, बळीराम थापडे, सर्जेराव जाधव, नागेश शिंदे, नारायण देवकते, भारत देवकते, परमेश्वर थापडे (उपसरपंच), रणूसिंग ठाकूर, शुभांगी शिंदे, अंगणवाडीच्या शिंदे मॅडम, सुमन शिंदे, विनोद शिंदे, जगन्नाथ शिंदे, संस्थेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ, महिला, युवक मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

# आम्ही त्या महिलेस ओळखतही नाही, कोणत्याही चौकशीस तयार: फड पिता - पुत्राचे आव्हान

- लोकेशन कॉल डिटेल्स सगळे काढा, आमच्या व नागपूरच्या महिलेचा काहीही संबंध नाही; कैलास फड व निखिल फड यांची पोलिसांना चौकशीची विनंती
- जातीमुळे सॉफ्ट टार्गेट, आम्हाला व आमच्या आडून धनंजय मुंडे यांना बदनाम करण्यासाठी कारस्थान - निखिल फड
- रंजना नागपूरकर यांचे आरोप फड पिता पुत्रांनी फेटाळले; कधीही भेट किंवा ओळख नसल्याचा निर्वाळा

**परळी । प्रतिनिधी**

नागपूर येथील रंजना नागपूरकर नामक महिलेने आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप केल्यानंतर परळीतील कैलास व निखिल फड या पिता पुत्रांनी स्वतःहून माध्यमांच्या समोर येत संबंधित महिलेचे आरोप फेटाळून लावले आहेत. सदरील महिलेला आपण ओळखत नाही, कधीही भेटलेलो नाही, कोणत्याही प्रकारे आपली व त्यांची भेट किंवा संवाद झालेला नाही, तरीही त्या आर्थिक गैरव्यवहार आणि बंदूक दाखवून धमकी दिल्याचा करत असलेला आरोप संपूर्णतः खोटा व तथ्यहीन असून, आपण मागील दहा वर्षांत कधी नागपूरला गेलो सुद्धा नाहीत. त्याचबरोबर संबंधित महिलेने सांगितलेला घटनाक्रम, त्यातील स्थळे व तारखा पाहून त्यांचे व आमचे कॉल डिटेल्स व मोबाईल लोकेशन काढावेत, संबंधित प्रकरणाचा व



आमचा किंवा आ. श्री. धनंजय मुंडे यांचा कुठलाही संबंध नाही, किंवा कोणत्याही प्रकारच्या चौकशीसाठी आपण तयार असून, चौकशीत दोषी आढळलो, तर द्याल ती शिक्षा भोगायला तयार आहे, असे आवाहन परळीतील फड पिता पुत्रांनी केले आहे.

माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या सह काही आजी - माजी मंत्री व पुढाऱ्यांचे नाव घेऊन पोलिस कर्मचारी असलेल्या आपल्या पतीला पोलिस चौकशीपासून वाचवण्यासाठी आपण मंत्रालयातील काही अधिकारी, माजी मंत्री तसेच फड पिता पुत्रांसह अनेकांची नावे रंजना नागपूरकर यांनी घेतली होती. तसेच आपली फसवणूक झाली असून पैसे परत मागायला गेले असता फड पिता पुत्रांनी आपल्याला बंदूक दाखवून भीती घातली व जीवे मारण्याची धमकी देऊन हाकलून दिले, असाही आरोप केला होता. मात्र फड पिता पुत्रांनी हे आरोप फेटाळून लावत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी याबाबत सखोल चौकशी करण्याचे आवाहन केले आहे. सदर महिला रंजना नागपूरकर यांची आपली ओळख नाही, कधीही भेट किंवा संवाद झालेला नाही, मग आम्ही बंदूक कधी दाखवली? त्या जो घटनाक्रम आणि तारखा सांगत आहेत, त्याप्रमाणे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी चौकशी करून आमचे कॉल डिटेल्स, लोकेशन सर्व काढावेत, आमचा दोष आढळला तर आम्ही द्याल ती शिक्षा भोगू, असे म्हणत फड पिता पुत्रांनी आपल्याला व आपल्या आडून धनंजय मुंडे यांना सॉफ्ट टार्गेट केल्याचा गंभीर आरोप केला आहे.

#### सिद्धेश्वर संस्थानच्या महाशिवरात्री सप्ताहाची उत्साहात सांगता

## विवेक महाराज शास्त्री यांचे काल्याचे किर्तन



**शिरूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या आणि धाकटी अलंकापुरी म्हणून नालौकिक मिळविलेल्या सिध्देश्वर संस्थानवर ४८ वा महाशिवरात्र सोहळ्याची सांगता सोमवारी विवेक महाराज शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली.या वेळी राजकीय मान्यवरांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.कंठी धरिला कृष्णमणी या अभंगावर विवेक महाराज शास्त्री यांनी कीर्तन केले.वैकुंठवासी ह.भ.प आबादेव महाराज यांनी सुरू केलेल्या महाशिवरात्री सोहळ्यानिमित्त अखंड हरीनाम सप्ताहाला त्यांच्या पश्चात वेदांताचार्य स्वामी विवेकानंद शास्त्री यांनी एका वेगळ्या उंचीवर नेले. या सोहळ्याला आमदार सुरेश धस यांच्यासह माजी आमदार भीमराव धोंडे, बाळासाहेब आजबे, ज्योती मेटे, भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष नारायण काशिद, प्रथम नगराध्यक्ष रोहिदास पाटील गाडेकर यांच्यासह शिरूर आणि पंचक्रोशीतील भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## अनाथ-वृद्धाश्रम भेटीतून आदित्यच्या विद्यार्थ्यांना सामाजिक जाणीवेचे धडे

#### आदित्य औषधशास्त्र महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची घाटसावळी येथे शैक्षणिक भेट



**बीड । प्रतिनिधी**

आदित्य औषधशास्त्र महाविद्यालय येथील विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमातील सामाजिक बांधिलकी उपक्रमांतर्गत लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब वृद्धाश्रम, घाटसावळी येथे भेट देत सामाजिक संवेदनशीलतेचा जिवंत अनुभव घेतला.५० विद्यार्थ्यांनी अनाथ-वृद्धाश्रम भेटीतून सामाजिक जाणीवेचे धडे मिळाले. अभ्यासक्रमानुसार अनाथ/ वृद्धाश्रम भेट देणे अनिवार्य असून,विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, सार्वजनिक विकासाची भावना आणि समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा निर्माण व्हावी हा या उपक्रमामागील उद्देश आहे. दि.१४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत झालेल्या या भेटीत ५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या जीवनप्रवासाची माहिती जाणून घेतली.

# युवकांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार अंगिकारले पाहिजे: पोलिस निरीक्षक घुगे

## घाटसावळीत सामाजिक उपक्रमांनी शिवजयंती साजरी

**बीड । प्रतिनिधी**

श्री विठ्ठल रुक्मिणी सेवाभावी संस्था पोखरी संचलित लोकनेते गोपिनाथराव मुंडे वृद्धाश्रम व जनसेवा व्यसनमुक्ती केंद्रात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मान्यवरांच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली .यावेळी उपस्थित लाभार्थी व रुग्ण मित्राला प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते फळं वाटप व मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते तथा बीड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष शिवाजीराव फड हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून





पिंपळनेर पोलीस स्टेशनचे ए पी आय घुगे साहेब, सरपंच बाबासाहेब पवार, दादासाहेब लांडे ग्रामविकास अधिकारी सोनवणे साहेब, संतोष लांडे, अनिरुद्ध लांडे, शिंदे साहेब, रामप्रसाद फड विनोद तांगडे, कपिल तांगडे, अंगद खवतड मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमाचे आयोजन संचालक भारतीय जनता पार्टी चे युवा नेते चंद्रकांत बप्पा फड व कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नितीन फड यांनी केले तर होते.

सुत्रसंचलन जनसेवा व्यसनमुक्ती केंद्राचे प्रकल्प समन्वयक व समुपदेशक प्रा.आजिनाथ शेरकर यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लोकनेते गोपिनाथराव मुंडे वृद्धाश्रमाचे व जनसेवा व्यसनमुक्तीचे कर्मचारी शहादेव फड ,गोरख फड ,संजय फड , दादासाहेब जावळे, अमोल नेहरकर, संकेत दराडे ,आबेद भाई यांनी परीश्रम घेतले शेवटी गर्जा महाराष्ट्र या गिताने समुपदेशिका सौ.वर्षा शेरकर यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

## अंजनवती येथे शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी !!



**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील बालाघाट परिसरात अत्यंत जागृत,संघटित व क्रियाशील गाव अशी अंजनवतीची ओळख आहे आज दि.१९ फेब्रुवारी रोजी सकाळी प्रतिवर्षाप्रमाणे ग्रामस्थांतर्फे सार्वजनिक शिवजयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते गेली अनेक वर्षांपासून सर्वच महापुरुषांची जयंती गावकरी एकत्रित येऊन साजरी करतात त्यामुळे सांस्कृतिक क्षेत्रात अंजनवतीकरांनी आपला वेगळा ठसा उमटविण्याचे काम केले आहे सदरील कार्यक्रमाचे आयोजन शिवशक्ती-भीमशक्ती विचार मंचाचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील यांनी केले होते गेले अनेक वर्षांपासून गावकऱ्यांच्या सतत मिळणाऱ्या भक्कम पाठिंब्यामुळे सदरील महोत्सवाचे हे २३ वे वर्ष असून डीजे मुक्त तसेच पारंपारिक वाद्य वाजवत जयंती सोहळा साजरा करून अंजनवतीकरांनी परिसरात आदर्श निर्माण केला आहे.

# आष्टी तालुक्यात शिवरायांना मानाचा मुजरा

- भगवे ध्वज, भव्य मिरवणुका, पोवाडे ढोल-ताशांच्या गजरात 'जय भवानी, जय शिवाजी' या जयघोषात राजेंना अभिवादन
- लक्ष्यवेधी; डोळ्याचे पारणे फेडणारी महिलांची रॅली; जळगाव कारखाना येथे महाराजांना अभिवादन करण्यासाठी हजारो शिवभक्तांच्या गावागावातून रॅली
- आ.सुरेश धस,मा.आ.भिमराव धोंडे,मा.आ.साहेबराव दरेकर,मा.आ.बाळासाहेब आजबे,जि.प.सदस्य सतिश शिंदे यांनी केले अभिवादन

**आष्टी । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती आष्टी तालुक्यात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. घराघरात गावागावात ठिकठिकाणी दिमाखात फडकणारे भगवे झेंडे आणि 'जय भवानी जय शिवाजी' अशा घोषणांनी अष्टदिशा दुमदुमत होत्या.तालुक्यातील कडा, जामगाव, धानोरा, धामणगांव,पांढरी, बेलगांव, हाजीपूर, वाळुंज, चिखली, ब्रम्हगाव, मातकुळी, तवलवाडी, दैठण, मंगरूळ, सह गावागावातील शिवभक्तांची मोटारसायकल रॅली भव्य दिव्य अशी लक्षवेधक ठरली तर आष्टी शहरातुन महिलांची रॅली लक्षवेधी ठरली सकाळी गावागावातील चौकांमध्ये महाराजांना अभिवादन करून विविध कार्यक्रमाने अभिवादन करण्यात आले. मिरवणूका हातात भगवे ध्वज,भगवे फेटे असलेल्या भव्य दिव्य रॅली जळगाव कडा कारखाना येथे महाराजांना अभिवादन करण्यासाठी दाखल झाल्या होत्या. संपूर्ण वातावरण भगवेमय झाले होते.

भगवे झेंडे, भगव्या पताकांनी शहर तालुका सजवला होता. शिवरायाच्या गितांचा आवाज अष्टदिशात घुमत होता. प्रचंड जोषात अभूतपूर्व मिरवणूका निघाल्या तालुक्यात प्रमुख ठिकाणी ढोलताशाच्या गजरात मिरवणुका काढण्यात आल्या. चौकाचौकामध्ये सामाजिक मंडळांनी शिवजयंतीनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित केले होते.





आष्टी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवरायांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून सर्वपक्षीय शिवजयंती साजरी करण्यात आली, पांढरी येथे ही छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून भव्य मोटारसायकल रॅली काढण्यात आल्या होत्या मातकुळी, वाळुंज, करंजी, धानोरा,कडा, किन्ही, चिखली, धामणगांव, जळगांव, बेलगांव, आदीसह तालुक्यातील गावागावात शिवाजी महाराजांना सांस्कृतिक कार्यक्रम, व्याख्यान, महापंगत विविध कार्यक्रमाने अभिवादन करण्यासाठी सकाळपासूनच शिवप्रेमींच्या रांगा लागल्याचे दिसून आले. जळगाव येथील महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी रॅली व शिवप्रेमी मोठ्या संख्येने दिवसभर दाखल होत अभिवादन करून नतमस्तक होत होते.हातात शिव ध्वज, भगवे जॅकेट, कुर्ता आणि फेटे बांधलेल्या युवकांच्या उत्साहाला उधाण आले होते. मिरवणुकीमध्ये युवकांनी भगवे झेंडे, भगवे फेटे असे सगळेच वातावरण भगवेमय झाले होते. विविध सामाजिक, राजकीय संघटनांनीही महाराजांना अभिवादन केले.

**रयतेचा राजा, युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती सर्वत्र उत्साहात साजरी केली जात आहे. शिव जयंतीनिमित्त आ.सुरेश धस,मा.आ.भिमराव धोंडे,मा.आ.बाळासाहेब आजबे,मा.आ.साहेबराव दरेकर,मा.जि.प.सदस्य सतिश शिंदे,युवा नेते अजय धोंडे, यांनी आष्टी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शिवरायांना अभिवादन करुन शिवभक्तांना शुभेच्छा दिल्या.**

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी २०२६ ●

# शिवजंयती ठरली आनंदाची पर्वणी

## दणकेदार : टाळ्यांचा कडकडाट, हस्याने नाट्यगृह दणाणले





**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त त्यांच्या कार्यकर्तृत्व व शौर्यावर आधारीत विविध सांस्कृतिक कार्यक्रम बीडकरांसाठी हास्याची, आनंदाची, मनाची उकल करण्याची संधी ठरली असून टाळयांचा कडकडाट व हास्याने नाटयगृह दणाणले. कार्यक्रमाचे नियोजन उत्तमरितीने केल्याने सर्वांना शिवजयंतीचा आनंद उपभोगता आला हे ख-या अर्थाने कार्यक्रमाचे यश म्हणावे लागेल.

यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित निखिल फाऊडेंश मुंबई यांनी शाहिरी लोकधारा हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.

या कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, सामान्य प्रशासनाचे उपजिल्हाधिकारी शैलेस सुर्यवंशी, जिल्हा क्रिडा अधिकारी आरविंद विद्यागर, तहसीलदार चंद्रकांत शेळके, शिक्षणाधिकारी रंगणाथ राऊत, शिक्षण विस्तार अधिकारी सिध्देश्वर माटे, अविनाश पाटील, रेवनाथ शेलार, कालिदास होसूरकर, अनिकेत काळे संबधित अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, नागरिक उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त त्यांच्या कार्यकर्तृत्व व शौर्यावर आधारीत सांस्कृतिक कार्यक्रमात प्रिया पवार यांनी एकच राजा इथे जन्मला शिवनेरीच्या किल्लयावर, हे गाणे सादर करुन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

छेडू नकोरे मथूरेच्या लाला... , जाऊ दे मथूरेच्या बाजारला... या गवळणीवर नाटयगृहातील शालेय विद्यार्थ्यांनी ठेका धरुन नाटयगृहात टाळयाचा कडकडाट मिळवला.

शैलेस निसर्गधं यांनी आईभवाणी तुझ्या भक्ताला हे गोधंळी गीत गाऊन प्रेक्षकांनाही ताल धरण्यास भाग पाडले.

जरीच्या चोळीला सोन्याचे लावते बटन, नटन माझ नटन समूहाने हे गीत सादर केले.

रोहीत जाधव यांनी विजयाची आली वार्ता, तोफेचा आवाज कडाडला या गीताने रसिक श्रोत्यांच्या अंगावर रोमांच उभे करुन उपस्थितांची दाद मिळवली.

प्रस्ताविक करतांना सुत्रसंलकाने विविध प्राण्याच्या आवाजाची, दादा कोंडके, निळु फुले, इंदोरीकर यांचे आवाजाची नक्कल करुन सर्वांना खिळवून ठेवले.

गर्जा महाराष्ट्र माझा या गीताने कार्यक्रमाचा समारोप झाला. यावेळी सामान्य प्रशासनाचे उपजिल्हाधिकारी यांनी निखिल फाऊंडेशन मुंबईच्या वतीने सादर करण्यात आलेल्या सर्व कलाकारांचे आभार मानले आणि कार्यक्रम पाहिजे त्यापेक्षाही कैक पटीने यशस्वी झाल्याचे मनोगत व्यक्त केले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा व विचारांचा गौरव करण्यासाठी या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद लुटला. दिप प्रज्वलन व छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करुन सांस्कृतीक कार्यक्रमास सुरुवात झाली.

# छत्रपती शिवराय यांची प्रेरणा घेऊन बीडमध्ये एक अनोखी आदर्श जयंती केली साजरी

- गरजू, ऊसतोड कामगारांना मोफत १०१ किराणा किटचे वाटप करून केली शिवजयंती साजरी
- बाजीराव (दादा) चव्हाण व शेतकरी राजा सामाजिक समितीच्या वतीने ऊसतोड कामगारांना मोफत किराणा किट केले वाटप

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजानीं रयत, प्रजा हीच आपली खरी संपत्ती मानून, स्त्रियांचा सन्मान, शेतकऱ्यांचे रक्षण आणि धर्मनिरपेक्ष न्यायव्यवस्था, स्वराज्य आणि देशप्रेम: स्त्री-सन्मान आणि रयतेची काळजी: रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावू न देण्याची शिस्त ही शिवराय यांची शिकवण आज तरुण पिढीसाठी प्रेरणादायी आहे. याच रयतेचे राजे, अखंड हिंदुस्तानाचे दैवत, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त आज दि १९ फेब्रुवारी रोजी धर्मवीर प्रतिष्ठान, तसेच शेतकरी राजा सामाजिक समिती यांच्यामार्फत बीड शहरातील, व जरुड गावातील ऊसतोड कामगार व गरजूंना १०१ किराणा किटचे मोफत वाटप करण्यात आले. बीड शहरातील



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून या मोहिमेचे सुरुवात करण्यात आली. शिवरायांची प्रेरणा घेऊन गरिबांना मदत करणे त्यांची सेवा करणे मदत केवळ पैशातच मर्यादित नसते तर समाधान, शिक्षण, मार्गदर्शन आणि सहकार्य ही देखील एक मदत आहे. हाच विचार घेऊन अखंड हिंदुस्तानाचे दैवत, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त बीड मधील ऊसतोड कामगार व गरजूंना मोफत किराणा किटचे वाटप बीड शहरांत व जवळील जरूड गावातील ऊसतोड कामगार यांना करण्यात आले. जयंतीनिमित्त व्यर्थ खर्च टाळून गरजूंना मोफत किराणा किट साहित्य वाटप करून बीड मध्ये ही एक आगळीवेगळी शिवजयंती साजरी करण्यात आली आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन, आरोग्यदूत, युवासेना मराठवाडा निरीक्षक श्री. बाजीराव (दादा) चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. कार्यक्रमा वेळी प्रमुख उपस्थिती, शेतकरी राजा सामाजिक समितीचे प्रदेशाध्यक्ष रोहित धुरंधरे, राज्य प्रवक्ता अशोक सोनवणे, मराठवाडा अध्यक्ष प्रवीणजी पालीमकर, बीड तालुका अध्यक्ष अशोक (दादा) ढोले पाटील, तालुकाउध्यक्ष प्रकाश तावरे,युवा उद्योजक सातिराम आण्णा ढोले पाटील,जलदुत राजेश काकडे,जरुडचे उप सरपंच पंजाबराव काकडे , अशोक दातवासे, कलाकार अशोक लोकरे,युवा नेते गणेश शिंदे,तसेच धर्मवीर प्रतिष्ठान, व शेतकरी राजा सामाजिक समितीचे,व सातिराम आण्णा ढोले पाटील सामाजिक फाउंडेशन महाराष्ट्र राज्य बीड समस्त पदाधिकारी आणि कार्यकर्ते व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बोरफडी येथे आज सुप्रसिद्ध अभिनेत्री रिंकू राजगुरु येणार

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानअंतर्गत कार्यक्रमास उपस्थित रहा : सरपंच कैलास घुगे



**बीड । प्रतिनिधी**

गावांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि विकसित महाराष्ट्र घडविण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत प्रचार व प्रसिद्धीसाठी मराठी चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध अभिनेत्री रिंकू राजगुरू आज (दि.२०) सकाळी १० वाजता बीड तालुक्यातील बोरफडी येथे भेट देणार आहेत. या कार्यक्रमाचे आयोजन बोरफडी ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आले असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सरपंच कैलास घुगे आणि ग्रामपंचायत सदस्यांनी केले आहे.

### कैलास घुगे यांनी केला गावाचा कायापालट

**बोरफडीचे सरपंच कैलास घुगे यांच्या नेतृत्वाखाली गावातील प्रत्येक वस्तीपर्यंत रस्ते, वीज व पाणी या मूलभूत सुविधा पोहोचविण्यात आल्या आहेत. विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून अंगणवाडी, आरोग्य केंद्र, ग्रामपंचायत कार्यालयाची इमारत उभारण्यात आली आहे. गावात अनेक ठिकाणी आसन व्यवस्था, उद्यान निर्मिती, वृक्षलागवड तसेच जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर करण्यात आली आहेत. या सर्व उपक्रमांमुळे बोरफडी हे गाव आदर्श गाव म्हणून नावारूपाला येत आहे.**

# बीड शहराच्या सुरळीत पाणीपुरवठ्यासाठी पालिका प्रशासन कामाला लागले

## आ. विजयसिंह पंडित व पालिका पदाधिकाऱ्यांनी घातले व्यक्तिगत लक्ष

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहराचा पाणीपुरवठा नियमित व सुरळीत व्हावा यासाठी पालिका प्रशासन पूर्णपणे तयारीला लागले आहे, बिंदूसरा धरणातून बीड शहरात येणारी मुख्य पाईप लाईन छत्रपती संभाजी महाराज बाह्यवळण चौकात उड्डाण पुलाचे काम करणाऱ्या यंत्रणेकडून फुटल्यामुळे शहरातील पाणीपुरवठा खंडीत झाला होता. आ. विजयसिंह पंडित यांनी याठिकाणी भेट देत भारतीय राजमार्ग प्राधिकरणाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संवाद साधला, यानंतर उड्डाणपुलाचे काम करणाऱ्या यंत्रणेने तातडीने सदर पाईपलाईन दुरुस्त करून दिली आहे. या पाईप लाईनची टेस्टींग पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने घेतल्यानंतर रात्री उशिरा पाणीपुरवठा सुरु करण्यात आला आहे. माजलगावच्या धरणातून येणाऱ्या अमृत पाणीपुरवठा योजनेतील जलवाहिन्यांची दुरुस्ती



व इतर कामेही युध्द पातळीवर सुरु आहेत. उपाध्यक्ष विनोद मुळूक व त्यांचे टीम बीड शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी तत्परतेने काम करत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

### आ. पंडितांची सूचना, महामार्ग प्राधिकरणाकडून काम मार्गी

**छत्रपती संभाजी महाराज बाह्यवळण चौकात उड्डाण पुलाचे काम करणाऱ्या यंत्रणेकडून बिंदूसरा धरणातून बीड शहराकडे येणारी मुख्य पाईपलाईन फुटल्यानंतर ती तातडीने दुरुस्त करावी अशी सूचना आ. विजयसिंह पंडित यांनी भारतीय राजमार्ग प्राधिकरणाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना केली. उड्डाण पुलात बाधित होणारी लाईन व स्लीप सर्व्हिस पिंपळनेर रोडवरील माजलगाववरून येणारी मुख्य लाईन इतरत्र हलवण्याचे अंदाजपत्रक तयार करून तातडीने काम हाती घेण्याचे सांगितले आहे. या कामामुळे बीड शहराच्या पाणीपुरवठ्यात कसल्याही प्रकारची अडचण बाधा येऊ नये याची काळजी महामार्ग प्रशासनाने घ्यावी असे सांगितले आहे.**



*बीड दैनिक मराठवाडा पत्र कार्यालयामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करतांना संपादक दत्तात्रय नरनाळे, आराध्य नरनाळे, श्रदां फुने, तनश्री नरनाळे.*



*बीड : अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरातील शिवतीर्थ येथे जाऊन भाजपचे युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर यांनी अभिवादन केले. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.*



*हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त आज या महामानवाला जिल्हा भाजपच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी भाजप नेते ॲड. सर्जे राव तात्या तांदळे, नवनाथ अण्णा शिराळे, अजय सवाई , प्रा. देविदास नागरगोजे, गणेश लांडे, सुंदर चव्हाण, अनिल चांदणे, शांतिनाथ डोरले, सुनील मिसाळ, विलास बामणे, अमोल वडतिले, राजू शहाणे, महादेव नागरगोजे, नरेश पवार, राजेश चरखा, राजेश गवळी, अमर सानप, केशव बडे, सचिन पदमुले आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.*



*हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्रीमंतयोगी राजे श्री.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी बीड शहरातील शिवतीर्थ येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून मानाचा मुजरा केला. व सर्व शिवभक्तांना शिवजन्मोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी सोबत युवा नेते दिपक घोडके पाटील, युवा नेते शामजी काकडे सह सर्व शिवभक्त उपस्थित होते..!*



*माजलगाव लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि, सुंदरनगर ता. धारूर जि. बीड चे कार्यालयात हिंदवी स्वराज्याचे सस्थापक राजाधिराज श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करनेत आली. प्रसंगी महाराजांचे प्रतिमेचे पुजन करून विनम्र अभिवादन करताना सचिव सुरेश लगाड, दासराव मोरे, भागवतराव वगरे, नागोराव निर्मळ, अशोकराव पाटील, गनेश सोळंके, दत्तात्रय शेवाळे, नितिन सोळंके*